क्रमांक १०४

# महाराष्ट्र विधानपरिषद

## पत्रक भाग दोन

**सोमवार, दिनांक १६ डिसेंबर, २०१९ / अग्रहायण २५, १९४१ शके**

१४६. महाराष्ट्र विधानपरिषद नियमावलीतील नियम २७८ अन्वये विधानपरिषदेच्या बैठकीसाठी उपस्थित असणाऱ्या प्रत्येक सदस्याने हजेरीपटावर सही करणे बंधनकारक आहे. ज्या सदस्याने कोणत्याही दिवशी हजेरीपटावर सही केली नसल्यास त्या दिवशी असा सदस्य विधानपरिषदेत अनुपस्थित असल्याचे गृहित धरण्यात येते. मा.सदस्य बैठकीस उपस्थित असून देखील हजेरीपटावर सही करावयाचे त्यांच्याकडून अनावधानाने राहून गेले असल्यास अशा सदस्यांनी त्याबाबत विधानमंडळ सचिवालयास त्याच दिवशी किंवा उशीरात उशीरा दुसऱ्या दिवशी कळविणे आवश्यक आहे. तथापि, असे निदर्शनास आले आहे की, सभागृहाच्या बैठकीस उपस्थित असूनही सही करण्याचे राहून गेले असल्यास याबाबत सदस्यांकडून बऱ्याच उशिरा म्हणजे २ दिवसानंतर किंवा त्यापेक्षा अधिक कालावधीनंतर लेखी पत्र देऊन या सचिवालयास कळविण्यात येते. त्यामुळे सन्माननीय सदस्यांची उपस्थिती ग्राह्य धरता येत नाही. त्यामुळे त्या सदस्यांच्या बैठकीची देयके मंजूर करताना अडचणी निर्माण होतात तसेच याबाबतीत महालेखाकार, भारत सरकार यांचेकडून लेखा आक्षेप येण्याची शक्यताही नाकारता येत नाही.

सबब, निदेशानुसार सर्व सदस्यांना कळविण्यात येते की, सदस्यांनी त्यांच्या अनुपस्थितीची सूचना त्याबाबतचे कारण नमूद करुन त्याच दिवशी अथवा उशीरात उशीरा दुसऱ्या दिवशी संबंधित अधिकाऱ्यांकडे लेखी स्वरुपात देणे आवश्यक आहे. अशा प्रकारची सूचना विहित मुदतीत न दिल्यास त्या दिवसाची उपस्थिती ग्राह्य धरता येणार नाही, याची सदस्यांनी कृपया नोंद घेऊन या सचिवालयास सहकार्य करावे.

**राजेन्द्र भागवत,**
सचिव (कार्यभार),
महाराष्ट्र विधानपरिषद

**विधान भवन,**
नागपूर,
दिनांक : १६ डिसेंबर, २०१९

\\Mlse२०२\d\E२-२१\E२-८\LAKSHWEDI १०१ & JODPATRA\२०१९\Patrak Bhag २ -.doc